# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेस नोट ३८५-२०२४ दिनांक :- १६/१०/२०२४

## “Share Trading मध्ये गुंतवणुक करण्यास सांगुन तक्रारदार यांची फसवणुक केलेल्या रक्कमेपैकी ४,१६,०००/- रु तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश ”

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील वालीव पोलीस ठाणेचे हद्दीत राहणारे तक्रारदार नामे श्री. बुरमान यांना व्हॉटसअप खात्यावर एक अनोळखी मोबाईल धारकाकडुन लिंक प्राप्त झाली. तक्रारदार यांनी लिंकवर क्लिक केले असता तक्रारदार यांचे मोबाईलमध्ये कोटक महेंद्र बँकेचा लोगो असलेले ॲप डाऊनलोड झाले व त्यामध्ये शेअर ट्रेंडिंग करुन अधिक नफा मिळविण्याबाबत नमुद केले होते. त्यानंतर तक्रारदार यांनी ॲपद्वारे ऑनलाईन रक्कमेचा भरणा करुन गुंतवणुक केली. परंतु त्यांना कोणताही परतावा परत मिळाला नाही. तक्रारदार यांनी त्यांचे फसवणुकीबाबत सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज दिल्याने सदरबाबत नोंद घेण्यात आली. तसेच तक्रारदार यांची NCCRP Portal वर ऑनलाईन तक्रार नोंदविण्यात आलेली आहे.

**(सायबर पोलीस ठाणे येथे अर्ज आवक क्रमांक १८४२ -बी/२०२४ दिनांक २८/०८/२०२४ अन्वये.)**

तक्रारदार यांचे ऑनलाईन NCCRP Portal वरील तक्रारीचे अनुषंगाने संशयीत बँक खात्यामध्ये फसवणुक झालेली रक्कम गोठविण्यात आली. तक्रारदार यांची रक्कम गोठविलेल्या बँक खात्यातील रक्कम परत मिळविण्याकरीता मा.न्यायालय यांचेकडे तसेच संबंधीत बँकेना वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला. सायबर पोलीस ठाणे यांचेकडुन वारंवार पाठपुरावा केल्याने तक्रारदार यांची फसवणुक झालेल्या रक्कमेपैकी ४,१६,०००/- रु मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.

## अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...

- **मोबाईल प्राप्त कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक करुन नये.**
- **कोणत्याही ॲपची पडताळणी केल्याशिवाय डाऊनलोड अथवा Investment ॲपमध्ये गुंतवणुक करु नये.**
- **Watsapp, facebook, Instagram अथवा Telegram Channel, वर जास्त परतावा देणा-या Promotional Adds वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.**
- **अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये Telegram Channel, Watsapp Group वर ॲड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे Sceenshot, Massages दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी सेबीची बनावट प्रमाणपत्रे दाखवुन फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुकदारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुकदारांना जास्त व खात्रिशिर परताव्याची हमी देतात. अशा गुंतवणुकीमध्ये आर्थिक फसवणुक होण्याचा धोका मोठया**

Scanned with CamScanner

- जास्त परतावा देण्याचे आमिष दाखविणा-या कोणत्याही ट्रेडिंग ॲपवर विश्वास ठेवु नये. तसेच ट्रेडिंग ॲपची विश्वासार्हता तपासणी केल्याशिवाय गुंतवणुक करु नये.
- **Share Market, Forex Trading, Crypto Investment, Mutual Funds** मधील गुंतवणुक करण्याअगोदर आपल्या वितीय सल्लागारासोबत चर्चा करुनच गुंतवणुक करा.
- आपली वैयक्तिक तसेच बँकेसंबंधीत गोपनीय माहिती कोणासही उघड करु नये.
- ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच **www.cybercrime.gov.in** अथवा **1930** या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, सपोनि/ स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, सफौ/मिलाग्रिस फर्नांडिस, पोअं/सावन शेवाळे, पोअं/ प्रशांत बोरकर, पोअं/शुभम कांबळे यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**

-----ooo-----

Scanned with CamScanner